!! श्री !!

# खासदार चंद्रकांत खैरे

## शिवसेना उपनेते

शिवसेना

जा.क्र. : खा.का.प्र.प ३९५ १६/११/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

## केंद्रेकर यांच्या नियुक्ती बद्दल खासदार खैरे यांनी केले अभिनंदन

## लोकमान्य धार्मिक स्थळांसाठी सकारात्मक भुमिका घेणार असल्याचे केंद्रेकरांचे आश्वासन

**संभाजीनगर ( दि.२१ ) :** मी शिवसेना प्रमुखांचा कडवट शिवसैनिक आहे, हिंदूत्व हा आमचा प्राण आहे. जनभावनेची पर्वा न करता हिंदूंची धार्मिक स्थळे पाडणे आम्ही सहन करणार नाही. या अगोदारच्या अनागोंदी कारभाराची आपल्याला जाणीव झालीच असेल, आपण यावर योग्य भूमिका घ्याल अशी अपेक्षा खासदार चंद्रकांत खैरे यांनी बैठकीच्या सुरुवातीस बोलुन दाखविली. मी यादी पाहिली त्यात चुका आहेत. या पुढे कोणतेही कृत्य हे बेजबाबदार पणाचे प्रशासना कडुन घडणार नाही, धार्मिक स्थळांचे प्रत्येक प्रकरण स्वत: पाहुन कायद्याच्या चौकटीत राहुन काम करण्यात येणार असल्याची ग्वाही आयुक्त सुनिल केंद्रेकर यांनी बैठकीत दिली. यावेळी मनपाच्या प्रभारी आयक्त पदी नियुक्त झाल्या बद्दल त्यांचे पुष्पगुच्छ देवुन खासदार चंद्रकांत खैरे यांनी अभिनंदन केले.

सिडकोच्या कार्यालयात आज बैठक पार पडली त्यात मंदिरे वाचविणे, सिडकोच्या समस्या, समांतर जलवाहिनी व भुमिगत गटार योजना या संबंधी चर्चा करण्यात आली. शहरातील मंदिरांची पाडापाडी होवु नये व मंदिरांना अधिकृत करण्याची मागणी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी सिडकोचे मुख्य प्रशासक व प्रभारी आयुक्त सुनिल केंद्रेकर यांच्या कडे केली. सिडकोतील मंदिरांबाबत मुंबईतील सिडकोच्या नियमांच्या धर्तीवर सद्य किंमतीच्या पाच टक्के रक्कम सिडकोला भरुन लोकमान्यता असलेली जुनी मंदिर, धार्मिकस्थळे नियमीत करण्याची बोर्ड नोट करणार असल्याचे केंद्रेकर यांनी बैठकीत सांगीतले यावर खासदार चंद्रकांत खैरे यांनी ही रक्कम नाममात्र ठेवण्याची मागणी केली.बीड येथे असतांना सहा हजार अतिक्रमणे लोक मान्यतेने काढली त्यासाठी कुठेही प्रशासनाच्या वतीने कारवाई करण्याची आवश्यकता भासली नाही. त्याच पध्दतीने लोकांमध्ये जावुन कायद्या नुसार लोक मान्यतेने धार्मिक स्थळांबद्दल भूमिका घेवु ,मंदिरे, धार्मिक स्थळे ही सांस्कृतिक गरज असुन शहरातील इतर धार्मिक स्थळे, जी रस्त्यात आहे आणि ती काढण्यास लोकमान्यता मिळेल अश्या धार्मिक स्थळांबाबत कठोर भुमिका घेवु असे केंद्रेकर म्हणाले. या भुमिकेचे खासदार चंद्रकांत खैरे यांनी स्वागत केले.

सिडकोच्या प्रश्नासंबंधी निवेदन मुख्य प्रशासक सुनिल केंद्रेकर यांना सादर करण्यात आले. यात ना हरकत प्रमाणपत्र, सोसायटींचे प्रश्न, सिडकोत जलतरण तलाव, हस्तांतरण या विषयांचा समावेश आहे. त्यावर सकारात्मक निर्णय घेवु असे आश्वासन केंद्रकर यांनी दिले. समांतर जलवाहिनीचा पुर्ण अभ्यास केल्यानंतरच त्यावर भूमिका स्पष्ट करु. प्रथम दर्शनी निदर्शनास आल्या नुसार व स्वत: अभियंता असल्याने खुप हुशार माणसे कमी अभ्यास करतात, जास्त बोलतात, वक्तव्य करतात त्याला अधिकारी अभ्यासपुर्ण व जबाबदारीने उत्तरे देत नसल्याने गैरसमज असल्याचे जाणवते आहे. लवकरच या संबंधी अभ्यास झाल्यानंतर भूमिका स्पष्ट करु असे केंद्रेकर म्हणाले भुमिगत गटार योजनेच्या निधी बद्दल चर्चा केली. यावर दुस-या हप्त्याचा निधीचे काळजी करु नका, केंद्राकडुन तो निधी मिळविण्यासाठी पाठपुरावा करु असे आश्वासन खासदार चंद्रकांत खैरे यांनी दिले. रस्ता रुंदीकरण प्रकरणातुन रेंगाळलेली कामे,बाधीत इमारतींचे सर्वे आदी कामे तातडीने करण्याच्या सुचना खासदार चंद्रकांत खैरे यांनी दिल्या. बैठकीस नगरसेवक नंदकुमार घोडेले, किशोर नागरे, विरभद्र गादगे, आशुतोष डंख, विश्वनाथ स्वामी, राजू खरे, साहेबराव घोडके, रावसाहेब डांगे, रोहीदास पवार, रमेश तारापुरे, बी.आर.राठोड, सुधीर भाले, आदींची प्रमुख उपस्थिती होती.

**प्रसिध्दी प्रमुख**

**फोटो मेल केला आहे.**

**योगेश पायघन / गणेश वाघ.**

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , 8484066606/9604384400/

yp4329@gmail.com 7769052525